# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर

## पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची सुचना

पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांची अधिसूचना दि. **14/09/2006** व सुधारीत अधिसूचना दि. **01/12/2009** अन्वये **मे. अंबुजा सिमेंट लिमिटेड या कंपनीद्वारे दहेगांव-गोवारी भूमिगत कोळसा खाणीच्या विकास आणि संचालनासाठी एकुण 1562 हेक्टर क्षेत्रफळामध्ये 1 दशलक्ष टन प्रतीवर्ष उत्पादनाकरीता गोवारी, सिंदी, खैरी, तोंडाखैरी, बोरगांव खुर्द, बेलोरी, झुणकी, ता. कळमेश्वर आणि वलनी, खंडाळा, पारडी, ता. नागपूर ग्रामीण, जि नागपूर येथील प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीकरिता अर्ज** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केलेला आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजीत करण्यात येत आहे. लोकसुनावणीचे ठिकाण, दिनांक व वेळ खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

सदर प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवासी, पर्यावरणविषयी काम करणाऱ्या संस्था, तसेच सदर प्रकल्पामुळे अन्यप्रकारे प्रभावीत होणारे रहिवासी यांना सदर प्रकल्पासंबंधी विचार, टिका, टिप्पणी तोंडी किंवा लेखी स्वरुपात जाहीर सुनावणी दरम्यान सुध्दा नोंदविता येतील.

सदर जाहीर लोकसुनावणी प्रकल्पाच्या परिसरात खालील ठिकाणी घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| **सुनावणीचे ठिकाण** | **:** | **प्रकल्पाचे प्रस्तावित स्थळ,<br>मे. अंबुजा सिमेंट लिमिटेड,<br>दहेगांव-गोवारी भूमिगत कोळसा खाण<br>खसरा क्र. 90, वलनी, ता. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर.** |
| **सुनावणीची तारीख** | **:** | **10/09/2025.** |
| **सुनावणीचे वेळ** | **:** | **सकाळी 11.30 वाजता.** |

सदर प्रकल्पाबाबत लेखी स्वरुपात विचार, टिका, टिप्पणी ही जाहीरात प्रसिध्द झाल्यापासुन जाहीर लोकसुनावणीच्या तारखेपुर्वी खालील पत्यावर किंवा इ-मेलद्वारे पाठविण्यात याव्यात.

| प्रादेशिक कार्यालय | प्रादेशिक कार्यालय |
|---|---|
| **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.<br>फोन नं. 0712-2560852 \| Email: ronagpur@mpcb.gov.in** | **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.<br>फोन नं. 0712-2560852 \| Email: sronagpur1@mpcb.gov.in** |

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्ताऐवज (इंग्रजी व मराठी) मध्ये खालील कार्यालयांमध्ये उपलब्ध आहेत. संबंधीत व्यक्ती खालील कार्यालयामध्ये सदर कागदपत्रे कार्यालयीन वेळेत अभ्यासू शकतील.

1) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
2) जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर
3) जिल्हा परिषद, नागपूर
4) पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, प्रादेशिक कार्यालय, (पश्चिम झोन), तळ मजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हिल लाईन्स, नागपूर-440001
5) पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, 15 वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32
6) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), सायन सर्कल, सायन (पुर्व), मुंबई-22
7) प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
8) उप-विभागीय अधिकारी, कळमेश्वर/नागपूर ग्रामीण, जि. नागपूर.
9) तहसिल कार्यालय, कळमेश्वर/सावनेर/नागपूर ग्रामीण, जि. नागपूर.
10) पंचायत समिती, कळमेश्वर/नागपूर ग्रामीण, जि. नागपूर.
11) नगर परिषद, कळमेश्वर, ता. कळमेश्वर, जि. नागपूर.
12) ग्रामपंचायत कार्यालय, गोवारी/सिंदी/खैरी/तोंडाखैरी/बोरगांव खुर्द/बेलोरी/झुणकी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर.
13) ग्रामपंचायत कार्यालय, वलनी/खंडाळा/पारडी, ता. नागपूर ग्रामीण, जि. नागपूर.
14) गट ग्रामपंचायत कार्यालय, धापेवाडा खुर्द/भडांगी, ता. कळमेश्वर, जि. नागपूर.
15) गट ग्रामपंचायत कार्यालय, बोरगांव, ता. नागपूर ग्रामीण, जि. नागपूर.

**स्वा/-**
**(धनश्री पाटील)**
**उप-प्रादेशिक अधिकारी -1, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,**
**5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर**